बुधवार, दि १५ एप्रिल २०२६ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक ३० वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# मस्तगड येथे भीमजयंतीचा अभूतपूर्व जल्लोष

## पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी वाहिली आदरांजली



**जालना । प्रतिनिधी -** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती आज जालना शहरासह संपूर्ण जिल्ह्यात मोठ्या उत्साहात आणि चैतन्याच्या वातावरणात साजरी होत आहे. शहराचे ऐतिहासिक केंद्र असलेल्या मस्तगड भागात भीमअनुयायांचा महासागर लोटला असून, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून पोलीस प्रशासनाच्या वतीने विनम्र अभिवादन केले.

अभिवादन केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना अजयकुमार बन्सल यांनी जिल्हावासीयांना भीमजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी केवळ उत्सव साजरा न करता बाबासाहेबांच्या विचारांचे अनुकरण करण्यावर भर दिला. ते म्हणाले: ‘‘डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक समतेची एक दूरदृष्टी दिली आहे. त्यांची धोरणे आजही देशाला दिशा दाखवणारी आहेत. अशा महामानवाची जयंती साजरी करताना आपल्यात उत्साह असणे स्वाभाविक आहे, परंतु खऱ्या अर्थाने त्यांना अभिवादन करायचे **पान २ वर**

# ब्लिंकिट, झोमॅटो रात्री उशिरापर्यंत, मग स्थानिक दुकाने लवकर बंद का?

## ॲड. महेश धन्नावत यांचा सवाल

**जालना । प्रतिनिधी -** ‘‘एकीकडे ब्लिंकिट आणि झोमॅटोसारख्या ऑनलाईन डिलिव्हरी सेवा रात्री उशिरापर्यंत सुरू असताना, दुसरीकडे स्थानिक दुकानदार आणि हॉटेल व्यावसायिकांना पोलीस प्रशासनाकडून रात्री १०-११ वाजताच दुकाने बंद करण्याची सक्ती केली जात आहे. हा स्थानिक व्यावसायिकांवर अन्याय आहे. पोलिसांनी शासनाच्या धोरणांचा आदर करून रात्री उशिरापर्यंत दुकान उघडे ठेवणाऱ्या व्यावसायिकांना संरक्षण द्यावे,‘‘ अशी मागणी नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश धन्नावत यांनी केली आहे. ॲड. धन्नावत यांनी यापूर्वी पोलीस अधीक्षकांना निवेदन देऊन या समस्येकडे लक्ष वेधले होते. आता त्यांनी लोकप्रतिनिधींनी या प्रकरणात पुढाकार घेऊन शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी, असे आवाहन केले आहे.

**शासकीय धोरण आणि न्यायालयाचा निर्णय काय सांगतो?**

ॲड. धन्नावत यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या एका महत्त्वाच्या निकालाचा संदर्भ दिला. ॲक्सलरेट प्रॉडक्ट्स व्हेंचर्स प्रा. लि. विरुद्ध महाराष्ट्र शासन या खटल्यात न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, **महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७** नुसार, काही विशिष्ट आस्थापना (उदा. बार, दारूची दुकाने) वगळता इतर दुकानांना २४ तास सुरू ठेवण्याची परवानगी आहे. पोलिसांना केवळ गैरसमजातून किंवा कायदा-सुव्यवस्थेचे कारण पुढे करून ही दुकाने बंद करण्याचा अधिकार नाही. या निकालात न्यायालयाने नमूद केले आहे की, २४ तास दुकाने सुरू ठेवल्याने ग्राहकांची सोय होते, अर्थव्यवस्थेला चालना मिळते आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतात.

**रात्री उशिरापर्यंत दुकाने सुरू राहण्याचे फायदे**


ॲड. धन्नावत यांनी सांगितले की, जालना शहरात अनेक विद्यार्थी कमवा व शिका योजनेअंतर्गत शिक्षण घेत आहेत. हॉटेल्स, कॅफे आणि दुकाने रात्री उशिरापर्यंत सुरू राहिल्यास त्यांना अर्धवेळ नोकरीची संधी मिळते. तसेच, अनेक नोकरदार आणि कामगार रात्री ८:३० किंवा ९:३० नंतर कामावरून घरी परततात. अशा वेळी हॉटेल्स आणि कॅफे रात्री ११:०० किंवा ११:३० पर्यंत सुरू राहिल्यास त्यांना आपल्या कुटुंबासोबत बाहेर जेवणाचा आनंद घेता येतो.

**स्थानिक व्यावसायिकांवर अन्याय** ते पुढे म्हणाले, ‘‘मोठी हॉटेल्स आणि क्लाउड किचन रात्री उशिरापर्यंत सुरू असतात. ब्लिंकिट आणि झोमॅटोसारख्या कंपन्या रात्री ११:४५ नंतरही घरपोच सेवा देतात. मात्र, लहान दुकानदार, हॉटेल व्यावसायिक आणि रस्त्यावरील विक्रेत्यांना पोलीस लवकर दुकाने बंद करण्यास भाग पाडतात. यामुळे त्यांच्या व्यवसायावर परिणाम होत असून, ही एक प्रकारची असमानता आहे.‘‘

‘‘आता लोकप्रतिनिधींनी या विषयात लक्ष घालून पोलिसांना शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश द्यावेत, जेणेकरून स्थानिक व्यावसायिकांना दिलासा मिळेल आणि नागरिकांचीही सोय होईल,‘‘ असे ॲड. धन्नावत यांनी म्हटले आहे.

# पगारवाढ ९ रुपयांची अन् दंड लाखात

**नवी दिल्ली -** आयटी क्षेत्रात लाखोंच्या पगाराच्या बातम्या समोर येत असताना, दिल्ली-एनसीआरमधून एक धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. एका सॉफ्टवेअर इंजिनिअरने  वर आपली व्यथा मांडत सांगितले की, २०२५ मध्ये त्याला फक्त ९ रुपयांची वेतनवाढ मिळाली, तर २०२६ मध्ये कोणतीही वाढ देण्यात आली नाही. या इंजिनिअरने मे २०२४ मध्ये ६ महिन्यांच्या इंटर्नशिपद्वारे कंपनीत प्रवेश केला होता. त्यानंतर त्याला फुल-टाईम नोकरी मिळाली आणि त्याचा वार्षिक पगार ४.२५ लाख रुपये निश्चित करण्यात आला. आयटी क्षेत्रात मंदी असल्याने त्या परिस्थिती त्याने कमी पगारातही काम स्वीकारल्याचं त्याने सांगितलं. फक्त ९ रुपये पगार वाढ मिळाल्यानंतरही त्या सॉफ्टवेअर इंजिनिअरला नोकरी सोडणं सोपं नाही. कंपनीच्या नियमांनुसार, त्याला २ वर्षांचा सर्विस बॉन्ड पूर्ण करणे बंधनकारक आहे. जर तो त्या आधी नोकरी सोडेल, तर त्याला १.५ लाख रुपये दंड भरावा लागणार आहे.



## संपादकीय

# मेलडी क्वीन आशाताई काळाच्या पडद्याआड

गेली सात दशके आपल्या जादुई स्वरांनी चाहत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या आणि असंख्य संगीत प्रेमींच्या हृदय सिंहासनावर अधिराज्य गाजवणाऱ्या जेष्ठ अष्टपैलू गायिका, मेलडी क्वीन आशा भोसले यांचा रविवार दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्वावरच नाही तर संपूर्ण देशावर शोककळा पसरली आहे. आशाताईंच्या निधनाने केवळ संगीत विश्वाचीच नाही तर देशाची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या निधनाने संगीत विश्वाला वाहून घेतलेला आणि आपल्या जादुई स्वरांनी संपूर्ण संगीत विश्वावर अधिराज्य गाजवणारा शेवटचा तारा निखळला. भारतीय संगीत विश्व ज्यांच्या नावाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही अशा मोजक्या कलाकारात त्यांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल. ८ सप्टेंबर रोजीच आशाताईंचा ९२ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी त्यांचा उत्साह पाहता त्या वयाची शंभरी पार करतील असेच वाटत होते पण नियतीला हे मान्य नव्हते असेच म्हणावे लागेल. वयाच्या ९० व्या वर्षी त्यांनी ३ तासांचा संगीत कार्यक्रम केला होता असे कोणाला सांगितले तर कोणाचा त्यावर विश्वासही बसणार नाही. कारण आपल्या आवाजाप्रमाणे कायम चिरतरुण असणाऱ्या आशाताईंमध्ये वयाच्या नव्वदीतही वीस वर्षाच्या तरुणीला मागे पाडेल एवढी ऊर्जा होती. वयाच्या ९२ व्या वर्षीही त्यांच्यात गाण्याची, स्वर उंचावण्याची क्षमता एवढी होती की त्यांच्या आसपास कोणतीही गायिका फिरू शकत नाही. आपल्या सात दशकांच्या संगीत कारकिर्दीत त्यांना भारतरत्न सोडता सर्वच पुरस्कार मिळाले. तीन वर्षापूर्वी २४ मार्च २०२३ रोजी आशाताईंना प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराने महाराष्ट्र सरकारतर्फे गौरविण्यात आले होते तेव्हा संगीत प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथे झालेल्या एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला होता. यावेळी तेव्हाचे उपमुख्यमंत्री व सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, तत्कालीन सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, तत्कालीन शिक्षण मंत्री दीपक केसरकर तसेच भारतरत्न सचिन तेंडुलकर उपस्थित होते. आशा भोसले यांचे संगीत क्षेत्रात खूप मोठे योगदान आहे. आशा भोसले यांनी गेली सत्तर वर्ष संगीत कलेची जी सेवा केली आहे ८ सप्टेंबर १९३३ रोजी जन्मलेल्या आशाताईंना संगीताचे बाळकडू त्यांच्या घरातच मिळाले. १९४३ साली माझा बाळ या चित्रपटात दत्ता डावजेकर यांनी संगीतबद्ध केलेल्या चला चला नव बाळा... या गाण्याने आशाताईंनी चित्रपट गायनाला प्रारंभ केला. वयाच्या पंधराव्या वर्षीच म्हणजे १९४८ साली हंसराज बहल यांच्या चुनरिया या चित्रपटात सावन आया हे गाणे गाऊन त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. १९५३ साली बिमल रॉय यांनी त्यांना आपल्या परिणिता या चित्रपटातील गाणी गाण्याची संधी दिली. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. १९५४ साली राज कपूर यांनी बूट पॉलिश या चित्रपटात मोहम्मद रफी यांच्यासोबत नन्हे मुन्ने बच्चे तेरे मुठ्ठी मे क्या है हे गाणे गायला दिले. १९५६ साली सीआयडी हा चित्रपट आला या चित्रपटातील त्यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. १९५७ साली आलेल्या नया दौर या चित्रपटातील गाणी तर खूपच लोकप्रिय झाली आणि सर्वत्र आशाताईंचे नाव झाले. आशाताई हिंदी चित्रपट सृष्टीतील आघाडीची गायिका म्हणून नावारूपास आल्या. त्या काळातील सर्वच संगीतकारांची गाणी त्यांनी गायली. मागील सत्तर वर्षात असा एकही संगीतकार नसेल ज्यांनी आशाताईंना आपल्यासाठी गाण्याची विनंती केली नसेल. १९४८ पासून सुरू झालेला आशाताईंच्या संगीत कलेचा प्रवास आज थांबला. आशा भोसले यांनी मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तामिळ, मल्याळम, इंग्रजी, रशियन अशा विविध भाषेत सोळा हजारांहून अधिक गाणी गायली आहेत. त्यांनी एक हजारांहून अधिक चित्रपटासाठी गायन केले. हिंदी चित्रपटसृष्टीतील गायनासाठी त्यांना सात वेळा फिल्मफेअर पुरस्कार तर दोनवेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. २००० साली त्यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्काराने तर २००८ साली मानाच्या पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्या निधनाने संगीत प्रेमींच्या हृदय सिंहासनावर अधिराज्य गाजवणारी मेलडी क्वीन काळाच्या पडद्याआड गेली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

# सभापतींना सरकारी गाड्या दिल्या तर, नागपूर मनापाकडून आमजनतेच्या खिशाला कात्री लागेल

नागपूर महानगरपालिकेत काही दिवसांपूर्वी महापौर, उपमहापौर,स्थायी समिती अध्यक्ष आणि सभापतींची नियुक्ती करण्यात आली.याचे मनापासून स्वागत.कारण नागपूरच्या विकासाकरिता या सर्वांसह संपूर्ण नगरसेवकांचा हातभार लागतो.तेव्हाच नगरचा विकास संभव होतो.कारण नगरसेवकांची परिभाषाच नगरची सेवा करण्याची असते. सध्या महापालिका प्रशासन खाजगी कंत्राटदारांमार्फत पेट्रोल, डिझेल,सीएनजी वाहने भाड्याने घेते.१० सभापतीपैकी विधि समितीच्या सभापतीकडे आधीच एक वाहन आहे ( मार्च २०२१ पासून) त्यामुळे आता उर्वरित ९ सभापतींसाठी नवीन वाहने मंजूर करण्याचा प्रस्ताव आहे.समजा मनपाकडून वाहने सभापतींना मंजूर झाली तर एका वाहनाला अंदाजे दरमहा ५० ते ६० हजार रूपयांचा खर्च येईल.त्यानुसार नऊ अध्यक्षांच्या एकूण मासिक खर्च ५ लाख रुपये आणि वार्षिक खर्च अंदाजे ६० लाख रूपयांचा असेल असा अंदाज आहे. हा संपुर्ण पैसा आमजनतेच्या खिशातुन उकळल्या जाईल व ही एकप्रकारची खुली लुट समजली जाईल ही बाब कितपत योग्य समजावी याचा विचार सरकारने आणि प्रशासनाने करावा व स्थायी समितीकडे पाठविलेला प्रस्ताव सन्माननीय आयुक्तांनी रद्द करावा व सरकारने यावर लक्ष केंद्रित करावे. शहराचा विकास करायचा असेल तर नगरसेवकांच्या व सभापतींच्या खर्चावर सरकारने आवर घालने आवश्यक आहे.महानगरपालिकेच्या नियमानुसार केवळ महापौर,उपमहापौर,स्थायी समिती अध्यक्ष, परिवहन सभापती आणि सत्तापक्ष-विरोधी पक्ष नेत्यांनाच सरकारी वाहने उपलब्ध करून दिले जाते.उर्वरित विशेष समित्या या केवळ ''सल्लागार'' स्वरूपाच्या असतात. तरीही १० विशेष समित्यांच्या सभापतींनी पदभार स्वीकारताच गाड्यांसाठी प्रशासनावर दबाव टाकला आहे.यावरून स्पष्ट होते की आतापर्यंत स्वतःच्या वाहनांनी फिरणारे हे लोकप्रतिनिधीची खुर्ची मिळताच जनतेचे खिसे कापायला लागले की काय असे वाटत आहे.सभापतींना सरकारी गाड्या मिळाल्या तरच शहराचे काम होईल अन्यथा होणार नाही का?असा प्रश्न आज सर्वसामाण्यांच्या मनात भेडसावत आहे. सभापतींची निवड लोकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी करण्यात आली आहे.परंतु सध्या सभापती सरकारी गाड्यांच्या मागणीच्या मार्फत स्वतःच्या निराकरणाकडे जास्त लक्ष देतांना दिसतात. आज मनपाची तिजोरी खाली असल्याचे सांगितले जाते,अशा परिस्थितीत सभापतींना गाड्यांची आवश्यकता का भासावी? सभापती शहराचा विकास करणार की सरकारी गाड्यांचा बोजा आमजनतेवर लादुण त्यांचे खिसे रिकामे करणार असे अनेक प्रश्न आज उपस्थित होत आहे.नागपूरमध्ये अनेक ज्वलंत समस्या आहेत.यात डंपिंग यार्ड, मनपाचे दवाखाने, नागनदी शुध्दीकरण, मनपाच्या शाळा, आरोग्य सुविधा, पाण्याचे वाढते बिल, वाढते कर,दुषित पाणी अश्या प्रकारे आम जनतेच्या अनेक समस्या आहेत याकडे सभापतींनी लक्ष केंद्रित केले पाहिजे.माझ्यामते नागपूर महानगरपालिकामध्ये सभापतींना सरकारी गाड्यांची काहीही आवश्यकता नाही.कारण आपण सध्या अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करीत आहोत. त्यामुळे सर्वच सभापतींजवळ फोन आहेच फोनच्या माध्यमातून मनपाच्या कर्मचाऱ्यांना सोबत किंवा संबंधित अधिकाऱ्यांसोबत संपर्क साधून नागपूर शहराचे काम सहज पाहू शकतात व करू शकतात यासाठी सरकारी गाड्यांची अजिबात आवश्यकता नाही असे मला वाटते.आजच्या युगात सर्वांजवळ दुचाकी वाहन आहेच कोणाजवळ चारचाकी वाहने सुध्दा आहेत.अशा परिस्थितीत जर सभापतींना खरोखरच नागपूर शहराचा कायापालट करायचा असेल आणि स्वतःला नगरसेवक समजत असेल तर त्यांनी आपल्या वाहनांनी कार्य केले पाहिजे.कारण मनपामध्ये निवडून येणाऱ्या सर्वच नगरसेवकांची प्रार्थमिकता नगरची सेवा करण्याचे असते. नंतर पदाधिकारी असतात त्यामुळे सभापतींनी सामाजिक बांधिलकी ठेवून समाजसेवा हेच ध्येय समोर ठेवून नागरिकांच्या समस्यांकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. आज जर सरकारने सभापतींना सरकारी गाड्या दिल्या तर पुढे चालून संपूर्ण नगरसेवकांना सुद्धा गाड्या द्याव्या लागतील हेही नाकारता येत नाही. नागपुर महानगरपालिका ही जनतेच्या व शहराच्या विकासाच्या दृष्टिकोनातून निर्माण झालेली सरकारी यंत्रणा आहे हे सुद्धा नगरसेवकांनी लक्षात ठेवले पाहिजे. त्यातही नागपूर महानगरपालिकेची तिजोरी खाली असल्याचे सांगितले जाते.अशा परिस्थितीत नगरसेवकांनी जनतेला सुविधा देण्याचे सोडून स्वतःच्या सुविधांकडे जास्त लक्ष देत आहे असे जनतेला स्पष्ट दिसत आहे.आज घर टॅक्स,रोड टॅक्स, पाण्याचे बिल,विजे बिल मोठ्या प्रमाणात वाढले आहे व लोकांची कमाई कमी आणि टॅक्स (कर) मोठ्या प्रमाणात मनपाला द्यावा लागतो.याकडे संपूर्ण नगरसेवकांनी लक्ष केंद्रित केले पाहिजे तेव्हाच नागपूर विकास संभव आहे.सरकारी गाड्या वापरल्याने नागपूर विकास न होता फक्त स्वतःचा विकास दिसून येईल.माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, नागपूरसह राज्यातील संपूर्ण महानगरपालिकांमध्ये फक्त महापौर, उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्ष, परिवहन सभापती आणि सत्तापक्ष-विरोधी पक्षनेते यांनाच सरकारी गाड्यांची सुविधा द्यावी.अन्य पदाधिकाऱ्यांना सरकारी गाड्यांची काहीही आवश्यकता नाही.सरकारने नागपूरसह राज्याच्या महानगरपालिका पालिकांचा खर्च कमी करायचा असेल तर नगरसेवकांच्या व पदाधिकाऱ्यांच्या खर्चावर अंकुश लावला पाहिजे.यामुळे जनतेचा पैसा वाचेल, मनपाचे काम सुरळीत होईल.त्यामुळे नागपूर महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत वाहन खरेदीचा मंजूर झालेला प्रस्ताव सरकारने ताबडतोब रद्द करावा. जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं. ९९२१६९०७७९, नागपूर.**




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# घराघरात, गावांगावात, हनुमान चालीसा पाठ सुरू करा - डॉ प्रवीण तोगडिया

## सगळे हिंदू एकत्र करण्यासाठी मी पुन्हा बाहेर पडलो

**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी -** आम्हाला आमच्या अस्तित्व साठी लढावे लागले कारण आता आम्हाला सांगावे लागले की अब तो हिंदू ही आगे आणि हा नारा आता अजून बुलंद करण्याची वेळ आली असून या पुढे हिंदुनी जास्त संख्येने एकत्र येण्याची गरज असल्याचे सांगून हिंदू ही आगे या घोष वाक्याने त्यांनी कार्यक्रमाची सुरवात करत अब तो हिंदू ही आगे टेंभुर्णी येथे अब तो हिंदू ही आगे चा नारा बुलंद केला.

आपल्याला घरा घरात हनुमान चालीसा पठण करणे गरजेचे झाले असून त्या साठी तरुणांनी पुढे येण्याची गरज असल्याचे सांगून, मी काल डॉक्टर मंडळी यांचा भेट घेऊन हिंदू ला जमल्यास मुक्त इलाज देण्याची गरज असल्याचे देण्याची विनंती केली असता त्यांनी ती मान्य केली. बेरोजगारी कमी करण्याची गरज असून त्या साठी पुढे येण्याची गरज सर्व हाताला काम भेटण्याची गरज आम्ही हनुमान चालिसा च्या एकत्र येऊन प्रत्येक हाताला रोजगार देण्याचे काम आम्ही सुरवात केली असून आम्हाला शेतकरी यांच्या मालाला दाम भाव द्या असे ही त्यांनी मागणी केली.आम्हाला दान नको पण आमच्या शेती मालाला भाव द्या असे ही त्यांनी सांगितले.भारताच्या प्रत्येक गावात हनुमान चालीसा साठी आम्ही पुढे असून सगळ्या गावा गावात हे सुरू करण्याचे मानस.आम्हाला राष्ट्रीय बजरंग दल मार्फत पुढे होण्याची गरज असून सगळे हिंदू संघटित करणे आहे असे बोलून वाटलेला हिंदू एकत्र करण्याची अजूनही गरज आहे. सर्वात आधी आम्ही हिंदू आहे असे गरजांना करत त्यांनी हिंदू रक्तात जोश भरून दिला.देशात मुस्लिम लोक संख्या वाढत असल्याने लोकसंख्या वाढत असून आता तीन बच्चे हिंदू सच्चे अशी बोलण्याची वेळ आली आहे असे त्यांनी सांगितले.भारतात हिंदू घटला असून तो वाढला पाहिजे असे सांगून हिंदू ही जितेंगा असे त्यांनी सांगितले.

टेंभुर्णी मध्ये सामूहिक हनुमान चालिसा सुरू करण्याचे प्रन आज घेतले असून या मार्फत रोजगार सुरू केल्याचे सांगितले.आपले घर सुरक्षित करून एकत्र राहण्याची गरज असून हनुमान चालिसा सुरू करणे.जसे पक्के राम मंदिर रामाला भेटले तसे सगळ्या हिंदूला पक्के घर भेटले पाहिजे असे नमूद केले.टेंभुर्णी येथील दत्त मंदिर परीसरातील मोठ्या डोम मध्ये हा कार्यक्रम पार पडले.टेंभुर्णी येथून जाफ्राबाद हून पुढे खामगांव जाणार असल्याचे आयोजक यांनी सांगितले.

एकत्र कुटुंब आणि भरभक्कम कुटुंब साठी हम दो हमारे नको तर किमान तीन मुले तरी पाहिजे असून आपली संख्या वाढविण्याची गरज असल्याचे ही त्यांनी सांगितले.




परवा रात्री जालना येथील कार्यक्रम पूर्ण करून ते रात्री साडे नऊ वाजता टेंभुर्णी मध्ये दाखल झाले होते. शिवाजी नगर येथे त्यांच्या हस्ते हिंदू ही आगे ची शाखा स्थापन करून पुढे गावात मुक्काम साठी गेले होते. दरम्यान या सगळ्या वेळात टेंभुर्णी येथे मोठा पोलिस फौज फाटा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

---

# सत्यशोधक विद्यालयमध्ये क्रांती सुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी



**दत्ता देशमुख**

**टेंभूणी -** मानव विकास व पुर्ननिर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित, सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन जिल्हा जालना येथे आज दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी सत्यशोधक विद्यालयामध्ये क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य श्री सुनील जी वाकेकर साहेब तसेच सिरसगाव मंडप केंद्राचे केंद्रप्रमुख श्री चमकुरे सर, भोपळे सर यांनी क्रांती सुर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. याप्रसंगी विद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

---

पान १ वरुन

## मस्तगड येथे ...

असेल तर प्रत्येकाने बाबासाहेबांचे साहित्य आणि पुस्तके वाचली पाहिजेत. वाचनातूनच त्यांचे विचार समाजात खोलवर रुजतील.''

आज सायंकाळी सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे.

शांतता समितीशी समन्वयः पोलीस अधीक्षकांनी स्पष्ट केले की, उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस प्रशासनाला नेहमीच सहकार्य केले असून, यंदाही मिरवणूक शांततेत आणि सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सुरक्षा व्यवस्थाः खबरदारीचा उपाय म्हणून शहराच्या मुख्य मार्गांवर, विशेषतः संवेदनक्षम भागांत मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. सीसीटीव्ही आणि ड्रोनच्या माध्यमातूनही देखरेख ठेवली जात आहे.

सकाळपासूनच मस्तगड परिसरातील बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी अबालवृद्धांनी गर्दी केली होती. जय भीमच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला आहे. ठिकठिकाणी सामाजिक उपक्रम, आरोग्य शिबिरे आणि अन्नाचा प्रसाद (भोजनदान) वाटप करण्यात येत आहे.

याप्रसंगी पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी, जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशासनाने जनतेला शांततेत उत्सव साजरा करण्याचे आवाहन केले असून, अफवांवर विश्वास न ठेवण्याचेही बजावले आहे


# सव्वीसावे पुण्यस्मरण !

॥ भावपुर्ण श्रद्धांजली ॥



स्व. सुशीलाबाई गणपतराव मानकर
स्मृती दिन: १५ एप्रिल २०००

आई, तुला जाऊन आज २६ वर्षे पूर्ण झाली, पण असा एकही क्षण नाही जेव्हा तुझी आठवण आली नाही. तू आमच्या कुटुंबाचा कणा होतीस. आपल्या कुटुंबातील मोठी सून असूनही तू तुझ्या तिन्ही जावांना बहिणीसारखे प्रेम दिलेस आणि काकांना भावासारखा जीव लावलास. तुझा मितभाषी स्वभाव, सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती आणि कोणाबद्दलही कधीही कटू न बोलणे, हे संस्कार आजही आम्हाला जगण्याची ताकद देतात. तू आमचं सर्वस्व होतीस आणि कायम राहशील. तुझ्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!

गणपतराव नानाभाऊ मानकर — विष्णू नानाभाऊ मानकर
विठ्ठल नानाभाऊ मानकर — एकनाथ नानाभाऊ मानकर
भरत गणपतराव मानकर — दत्ता गणपतराव मानकर
पीराजी विठ्ठल मानकर — लखन विठ्ठल मानकर
कृष्णा विष्णू मानकर — विकास एकनाथ मानकर
इंजिनीयर संभाजी भरत मानकर — चि. श्रेयस दत्ता मानकर

तुझे संपूर्ण मानकर परिवार

# जालना समृद्धी महामार्गावरील अपघातग्रस्त कुटुंबीयांना शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या पाठपुराव्यामुळे ५ लाखांची आर्थिक मदत

**जालना । प्रतिनिधी -** समृद्धी महामार्गावर झालेल्या दुर्दैवी अपघातामध्ये निधन झालेल्या निधोना गावातील चार महिला भगिनींच्या कुटुंबीयांना राज्य शासनाच्या वतीने प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. ही मदत शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मंजूर झाली.

या अपघातामुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून संबंधित कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार अर्जुनराव खोतकर यांनी तत्काळ शासन दरबारी पाठपुरावा करून पीडित कुटुंबांना आर्थिक दिलासा मिळवून दिला. यावेळी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस, उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांचे आभार व्यक्त करण्यात आले. शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे पीडित कुटुंबांना काही प्रमाणात आर्थिक आधार मिळणार आहे. या प्रसंगी तहसीलदार छाया पवार, शिवाजीराव आदमाने, राहुल आदमाने तसेच अपघातग्रस्त कुटुंबीय उपस्थित होते. स्थानिक नागरिकांनी देखील या मदतीबद्दल समाधान व्यक्त करत आमदार खोतकर यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.



# डॉ.बाबासाहेब यांची जयंती उत्साहात साजरी



**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनरावजी खोतकर यांच्या भाग्यनगर येथील संपर्क कार्यालयात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मा.नगरसेवक गोपीकिशन गोगडे यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेश पुष्पहार घालून पुजन करण्यात आले व अभिवादन करण्यात आले .यावेळी कार्यालय प्रमुख ज्ञानेश्वर माऊली डोंगरे, खरपुडीचे शाखाप्रमुख अण्णासाहेब गायकवाड, कैलास पा. देठे, स्वीय सहाय्यक रमेश चांदर, मनिष तनपुरे, अण्णासाहेब निकाळजे, समाधान खरात, गणेश वराडे,प्रदिप घुले आदी उपस्थित होते. व सर्वांना विश्ववंदणीय महामानव भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,भारतरत्न प.पू.डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

# सत्यशोधक विद्यालय मध्ये भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी




दत्ता देशमुख

**टेंभूर्णी -** मानव विकास व पुर्ननिर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित, सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन जिल्हा जालना येथे आज दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

# बुलढाणा १९ एप्रिल रोजी भव्य राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा

**बुलढाणा । प्रतिनिधी -** बुलढाणा शहरात रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ रोजी भव्य दिव्य राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा सकाळी ११.00 ते दुपारी ५.00 या वेळेत पार पडणार आहे.

या मेळाव्याचे आयोजन मा. कांतीलाल डोंगरदिवे वधू-वर सूचक केंद्र यांच्या वतीने करण्यात आले असून, कार्यक्रमाचे ठिकाण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक भवन त्रिशरण चौक बुलढाणा येथे आहे.

डोंगरदिवे वधू-वर सूचक केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी आजपर्यंत तब्बल १४७५५ पेक्षा अधिक विवाह जुळवून अनेक कुटुंबांना संसाराच्या वाटेवर मार्गदर्शन केले आहे. या यशस्वी परंपरेचा लाभ अधिकाधिक युवक-युवती व त्यांच्या पालकांनी घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष मा. कांतीलाल डोंगरदिवे यांनी केले आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माननीय अप्पर जिल्हाधिकारी रमेश घेवंदे माननीय शिक्षण अधिकारी पृथ्वीराज तायडे इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे

या राज्यस्तरीय मेळाव्यात विविध जिल्ह्यांतील इच्छुक वधू-वर व त्यांच्या पालकांना प्रत्यक्ष भेट, संवाद आणि माहिती देवाणघेवाण करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. तसेच सुव्यवस्थित नोंदणी प्रक्रिया, स्वतंत्र कक्ष व्यवस्था आणि मार्गदर्शन सुविधा आयोजकांकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. इच्छुकांनी वेळेत उपस्थित राहून या मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९८८१९५०७५८ / ८४९९९२५४२१ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

